
साप्ताहिक
# परळी परिसर
Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25
* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २८ जुलै २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावणमास उत्सवास प्रारंभ!
## यंदा चार श्रावणी सोमवार; पहिल्या श्रावणी सोमवारची तयारी पूर्ण





परळी वैजनाथ, (बातमीदार):- देशभरातील पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ओळख असलेल्या येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवास गेल्या शुक्रवार (दि.२५) पासून सुरूवात झाली असून गेल्या तीन दिवसात हजारो भाविकांनी येथे श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले आहे.

पहिल्या श्रावणी सोमवारची (दि.२८) मंदिरात तयारी पूर्ण झाली असून श्रावण सोमवारी दर्शन घेण्यासाठी शिवभक्त येथे दाखल झाले आहेत. श्रावणाबरोबर पाऊस सुरू झाल्याने सर्वांची काळजी मिटल्याने समाधानाचे वातावरण आहे. यामुळे श्री चे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येथे येत आहेत.

या पार्श्वभूमीवर सोमवारी दर्शनासाठी स्त्री, पुरूष अशा वेगवेगळ्या रांगा करण्यात आल्या आहेत. शंभर रुपये देणगी देवून विशेष दर्शनाची व्यवस्था मंदिरात केली गेली आहे. यासाठी वेगळी रांग मंदिरात आहे. पहाटे श्रीची काकडा आरती, अभिषेक पूजा होवून दर्शनाला सुरूवात होणार आहे. भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेने दर्शन रांगेच्या मार्गावर मंडप टाकले आहेत, पिण्याच्या पाण्याची सोयही केली आहे, पावसात भाविक भिजू नयेत म्हणूनही काळजी घेतली गेली आहे, दर्शन व्यवस्था चोख व्हावी म्हणून जागोजाग शंभरावर सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, पार्कींगचीही व्यवस्था मंदिर परिसरात केली गेली आहे. दर्शन व्यवस्था चोख व्हावी व भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेचे जेष्ठ विश्वस्त राजेश देशमुख, प्रा.बाबासाहेब देशमुख यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत. दरम्यान, श्रावण मास उत्सवात मंदिरात चोख पोलिस बंदोबस्त असणार आहे. यासाठी जागोजाग पोलीस तैनात करण्यात आले आहेत. चार पोलिस निरीक्षकांसह २७ इतर अधिकारी, ३०० पोलिस कर्मचारी व राखीव पोलिस दलासह इतर तुकड्यांचा बंदोबस्त मंदिर व परिसरात असणार आहे. मंदिर परिसरात जड व इतर वहानांना प्रवेश बंदी केली आहे. मंदिर मार्गावर यंदा मोठ्या प्रमाणात बेल फुलांची दुकाने थाटली आहे, परंतु बेलपानाचे भाव वाढल्याने भाविक नाराजी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, श्रावण महिन्यात श्रावणी सोमवारसह महिनाभर येथे शिवभक्तांची मोठी रेलचेल असणार आहे. शहर व परिसरातील यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध शिव मंदिरांसह इतर मंदिरात असे कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत.

दरम्यान, परळीत मोठा दमदार पाऊस न झाल्याने वैद्यनाथ मंदिर परिसरातील हरिहर तीर्थात पुरेसा जलसाठा झाला नाही. त्यामुळे श्रावणात शिवभक्तांना हरिहर तीर्थात स्नान करणे अवघड होणार आहे. ***

### आ.धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट...

माजीमंत्री आ.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने श्रावणमास उत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या महिन्यातील चारही श्रावण सोमवारी मंदिराचा मुख्य गाभारा तसेच मुख्य मंदिर फुलांनी सजवले जाणार आहे. गेल्या काही वर्षापासून प्रतिष्ठानकडून हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाचे भाविकांतून कौतुक होत आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाचे उद्घाटन

बीड, (जिमाका):- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा अधिकाधिक लाभ, पात्र लाभार्थ्यांना व्हावा या उद्देशाने बीड शहरामध्ये महामंडळाच्या मराठवाड्यातील उपविभागीय कार्यालयाचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.



याप्रसंगी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, श्रीक्षेत्र नारायणगडचे महंत शिवाजी महाराज, धनंजय देशमुख आदी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रम जालना रोडवरील राजू कॉम्प्लेक्स येथे पार पडला. मराठा समाजाला आर्थिक सक्षम करायचे ध्येय असून त्यासाठी महामंडळाकडून अधिक मेहनत, परिश्रम घेण्यात येईल, असे पाटील यावेळी म्हणाले.

या कार्यालयाच्या उद्घाटनानंतर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मेळावाही पार पडला. मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमातही पाटील यांनी मार्गदर्शन केले. ***

# दुष्ट, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना थारा देऊ नका - विलास बडे

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बरं नव्हे तर खरे बोला असे सांगत दुष्ट आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांना थारा देऊ नका असा कानमंत्र देत परळी वैजनाथ हे प्रभू वैद्यनाथांची आणि कर्तृत्ववान, प्रेमळ, धार्मिक लोकांची भूमी आहे. त्यामुळे परळीला बदनाम करण्याचे थांबले पाहिजे, यासाठी लोकप्रतिधी आणि सामान्य जनतेने पुढाकार घ्यावा असे आवाहन न्युज १८ लोकमतचे सहाय्यक संपादक विलास बडे यांनी केले. मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिरात ''भविष्याची दिशा युवा शक्तीचा सन्मान'' या विषयावर पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान झाले. व्यासपीठावर वैद्यनाथ बँकेचे माजी अध्यक्ष विकासराव डुबे,भाजप राज्य सदस्य सतीश मुंडे, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, भाजपा शहराध्यक्षा उमाकाकू समशेट्टे,एसडीओ लाटकर साहेब, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत,वैद्यनाथ बँकेचे संचालक रमेश कराड, संदीप लाहोटी,प्रकाश जोशी,जेष्ठ नेते श्रीहरी मुंडे , शीराम मुंडे,भास्कर नाना रोडे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, डॉ. हरिश्चंद्र वंगे, विजय वाकेकर, वैजनाथ जगतकर,शेख अब्दुल करीम, उमेश खाडे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना विलास बडे म्हणाले की, देशभर बीड जिल्हा व परळीची बदनामी होत असुन याचे खापर प्रसिध्दी माध्यमांवर फोडले जात आहे. परळीतील जनतेने खोट्याला खोटे व खऱ्याला खरे म्हणण्याची आपल्यातील ताकद बाहेर काढुन पिस्तुल्या व टवाळखोर गुंडांना आश्रय देणे, त्यांचे समर्थन करणे थांबवावे. अशा लोकांना राजाश्रय मिळत असल्याने परळीतील राजकारण्यांनीही सजग राहुन अशा लोकांना दुर ठेवले तर होत असलेली बदनामी टळेल असेही ते म्हणाले. बीड जिल्ह्यातील जनता कष्टाळु आहे परंतु या कष्टाला न्याय मिळालेला नाही. आज मिडीयात बीड व परळीचे वेगळे चित्र दाखवण्यात येत आहे. परंतु काही टोळक्यांना डोक्यावर घेतल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. परळीत गुणवत्ता ठासून भरलेली आहे. बाहेरच्या कुणाचे खपवून घेणारी इथली माणसं नसुन केवळ चांगली माणसे गप्प असल्याने गुंडाचा बोलबाला आहे. अशा गुंडांना गावात थारा न देता त्यांना विरोध केला पाहिजे असे सांगितले. गुंडांना विरोध केला तर परळीची होणारी बदनामी बंद होवुन संस्कारित, प्रेमळ, मेह नती परळी म्हणुन जगासमोर येईल असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आयोजक प्रा. पवन मुंडे म्हणाले की, महाराष्ट्रात सर्वाधिक लोकसंग्रह असलेला नेता म्हणून पंकजाताई मुंडे यांना ओळखले जाते. एखादा नेता निवडणूकीत पराभूत झाला म्हणून सहा- सात कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्याची महाराष्ट्राच्या इतिहासातील ही पहिलीच घटना असेल असे सांगुन जनतेचे एव्हढे प्रेम ना. पंकजाताई मुंडे यांना मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले. ना. पंकजाताई मुंडे या निष्कलंक आणि चारित्र्यसंपन्न नेतृत्व असुन त्यांच्यामुळे आपल्या परळीचा नावलौकिक वाढला असुन असे नेतृत्व जनतेने जपले पहिजे असे आवाहन प्रा. पवन मुंडे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपचे पदाधिकारी व सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. व्याख्यानाची सुरुवात महाराष्ट्र गीताने तर समारोप राष्ट्रगीताने झाला. यावेळी सभागृह लोकांनी खचाखच भरले होते. विलास बडे यांचे व्याख्यान होईपर्यंत कुणीही जागेवरून उठले नव्हते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश मुंडे यांनी केले. ***

# माजी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी राबवलेली खरेदी प्रक्रिया योग्यच-मुंबई उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

मुंबई, (बातमीदार):- तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेती पूरक साहित्य खरेदी साठी राबवलेल्या विशेष कृती आराखड्यांतर्गत कृषी साहित्याच्या थेट खरेदी व वितरणाच्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले असून, यास विरोध करणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळल्या आहेत.

न्यायमूर्ती आलोक आराधे व संदीप व्ही. मर्णे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या भोवती या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात आरोपांची राळ उठवून व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊन चुकीचे आरोप करण्यात आले होते. मात्र धनंजय मुंडे यांनी राज्य मंत्रिमंडळाची रीतसर मान्यता घेऊनच शेतकऱ्यांच्या हितासाठी हा धोरणात्मक निर्णय घेऊन सदर प्रक्रिया राबवली, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

राज्य शासनाने १२ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, बॅटरीवर चालणारे स्प्रेयर,



नॅनो युरिया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईड कीटकनाशक व कापूस साठवणीसाठी बॅग्स यांसारख्या पाच वस्तू शेतकऱ्यांना थेट खरेदी करून महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन व महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉर्पोरेशन यांच्यामार्फत पुरवण्याचे नियोजन करण्यात आले होते.

या निर्णयावरून धनंजय मुंडे यांच्या नावाने घोटाळा हा शब्द वापरून अनेकांनी मुंडेंची व कृषी विभागाची बदनामी केली होती.

या निर्णयाला विरोध करताना Agri Sprayers TIM Association व उमेश भोळे यांच्यासह तीन शेतकऱ्यांनी स्वतंत्र याचिका व जनहित याचिका दाखल करून या वस्तूंना थेट लाभ हस्तांतरण योजनेतून वगळण्यास विरोध दर्शवला होता. दरम्यान शेतकरी वर्गास उत्पन्न वाढीच्या दृष्टीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणाचा विचार करून शेतकऱ्यांच्या हीतास प्राधान्य देणारा धोरणात्मक निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला होता. त्याच्या विरोधात अनेकांनी माझ्यावर आरोप करून माझी बदनामी केली; मात्र आज न्याय देवतेने सत्याची बाजू समोर आणत योग्य न्याय केला असून आपला तो निर्णय योग्यच होता, असे म्हणत सत्यमेव जयते अशी प्रतिक्रिया या निकालावर व्यक्त केली आहे. ***

# 'साहित्यभारती'च्या बीड जिल्हाध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर यांची निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- अखिल भारतीय साहित्य परिषद संलग्न असलेल्या साहित्यभारती देवगिरी प्रांताच्या बीड जिल्हा शाखेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी प्रभाकर साळेगावकर यांची तर कार्यावाह म्हणून डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांची निवड झाली आहे.



बीड येथील सावरकर महाविद्यालयात प्रांत कार्यकारिणीचे युवराज नळे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत जिल्हा कार्यकारिणी निवडण्यात आली. कार्यकारिणीचे इतर पदाधिकारी पुढील प्रमाणे. जिल्हा कार्यकारिणीवर मंत्री म्हणून प्रशांत भानप, सहमंत्री म्हणून प्रा.अशोक घोळवे, मार्गदर्शक म्हणून मधुकर वैद्य, स्नेहल पाठक, उपाध्यक्ष म्हणून सुरेश भानप, चंद्रकन्या सारसेकर, कोष व कार्यालय प्रा.अनंत देशपांडे, प्रसार प्रमुख म्हणून दत्ता अंबेकर, महिला प्रतिनिधीपदी मंजुषा कुलकर्णी, गौरी देशमुख, लता जोशी, रूपाली कुलकर्णी, वाचक प्रतिनिधी म्हणून द.ल.वारे, स्मिता लिंबगावकर, युवा प्रतिनिधी म्हणून शांभवी जगदिश कुलकर्णी तर कार्यकारिणीवर सदस्य म्हणून डॉ.रमेश लांडगे, प्रा.सत्यप्रेम लगड, डॉ.श्रीमंत तोंडे, लक्ष्मण वाकडे, प्रा.दिपक देशमुख, प्रमोद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर श्री नळे यांच्या हस्ते नुतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. ****

# अंबाजोगाई आगाराच्या बसची दुरावस्था; चालकासह प्रवाशांना बसमध्ये धरावी लागते छत्री

अंबाजोगाई (बातमीदार):- अंबाजोगाई शहर व परिसरात गेली दोन दिवसांपासून पावसाची संततधार चालू आहे. सर्वच ठिकाणी पाणीच पाणी दिसून येत आहे. याचा फटका एसटी बसला देखील बसू लागला आहे. आधीच मोडकळीस आलेल्या बस त्यात आपला जीव मुठीत घेऊन प्रवासी प्रवास करताना दिसतात. पत्रा फाटलेल्या तसेच मोडकळीस आलेल्या बस अनेक ठिकाणी पाठवल्या जात आहेत. नाईलाजाने प्रवाशांना अशा बसमध्ये बसून त्यांना प्रवास करावा लागतो आहे. शनिवारी (दि.२६) अशीच एक बस अंबाजोगाई ते अहमदपूर जात असतांना संततधार पावसामुळे बसच्या पत्र्यातुन सदर बसमध्ये पावसाचे पाणी टपकु लागले. टपकणारे पाणी संपूर्ण बसमध्ये येऊ लागल्याने प्रवाशांना रेनकोट तसेच छत्रीचा सहारा घ्यावा लागला. पावसाचे पाणी बसच्या चालक केबिनमध्ये देखील टपकु लागल्याने बसमधील प्रवाशाला बस चालकाच्या डोक्यावर छत्री धरावी लागली. ***

खरय..
पण...



दर्शनाला रांगेतच जावे.
कारण वशिल्याच्या
चोर वाटा
मूर्तीपर्यंत नेतात...
देवा पर्यंत
नाही...!

# ग्लोबल ट्रस्ट व स्थानिक लोकसहभागातून तपोवन झाले पाणीदार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती हे ध्येय घेऊन कार्य करणाऱ्या मयांक गांधी यांच्या ग्लोबल ट्रस्ट ने पाणीदार गावे ,पाणीदार शिवार करण्याची मोहिम हाती घेतली आहे . गोवर्धन,हिवरा ह्या गावात नदीपात्रात जलसंधारणाची कामे केल्या नंतर ग्लोबल ट्रस्ट ने प्रसिद्ध रामनाथाचे देवस्थान असलेल्या तपोवन (ता.परळी) येथे स्थानिक लोकसहभागातून जलसंधारणाची सुनियोजित कामे केली आहेत. तपोवन ग्रामस्थांनी सदरील कामात १५ % आर्थीक वाटा उचलत ७ लाख ५० हजार रुपये लोकसहभागातून जमा करुन या ठिकाणच्या गुणवरा नदीपात्राचे रुंदीकरण आणि खोलीकरण केले आहे. पावसाचे पाणी नदीपात्रातून वाहून जावू नये यासाठी नदीपात्रात टप्प्याटप्प्यावर विशिष्ट प्रकारचे खोलीकरण करुन त्यात पाणी मुरावे असे सुनियोजन केले आहे. ह्या खोलीकरणातील पाणी अधिकाधिक जमीनीत मुरावे यासाठी नदीपात्रातील प्रत्येक ब्लॉक ठिकाणी 'रिचार्ज शाफ्ट' बोअर घेऊन त्या द्वारे जमीनीत नैसर्गिक रित्या पाणी मुरवण्याचे नियोजन केले आहे. या मुळे भूजल पातळीत जबरदस्त वाढ होणारी



पाणी वाढणार आहे आणि पाणी प्रश्न कायमचा मिटणार आहे. शेतकरी,ग्रामस्थ यांच्या मध्ये खूप आनंदाचे वातावरण आहे. लाखो लिटर पाणी या ठिकाणी जमीनत मुरणार आहे. उन्हाळ्या मध्येच नदीपात्राचे काम सुरु करण्यात आले होते , गाव हद्दीतील जवळपास अडीच किमी पर्यंत नदीपात्रात खोलीकरण व रुंदीकरणाचे काम करण्यात आले आहे. नदीपात्रात ११ दिवसांपासून पाणी मुरल्या जात आहे. खोलीकरण करुन नदीपात्रात जागोजागी तयार केलेले ब्लॉकेज( मोठी खड्डे ) मधून टप्प्या टप्प्याने पाणी पुढे सरकत आहे. प्रत्येक ब्लॉकिज मध्ये 'रिचार्ज शाफ्ट' बोअर आहेत ज्या द्वारे पाणी जमीनीत जात आहे. नदीपात्रात पाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात मुरत आहे कि अजून दोन दिवस तरी पाणी गाव शिवारातील नदी बाहेर पडू शकणार नाही. या मुळे भूजल पाणी पातळी वाढून ह्या भागातील विहिर ,बोअर पाणी स्त्रोतांना

आहे. हर्षोल्लासाने तपोवन ग्रामस्थांनी नदीपात्रात जाऊन जलपुजन केले. या वेळी ग्लोबल विकास ट्रस्ट चे कर्मचारी,अधिकारी उपस्थित होते. तपोवन नदीचे रुंदीकरण/खोलीकरण अंत्यत योग्य पद्धतीने ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेने केले .नैसर्गिक रित्या पाणी मुरवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु आता या ठिकाणी नदीपात्रात बंधारे होणे खुप आवश्यक आहे. शासन/प्रशासनाने या कडे लक्ष देऊन तपोवन च्या गुणवरा नदी पात्रात बंधारे उभारावेत अशी मागणी तपोवन ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

ह्या भागातील शेतकरी ऊस ,कापुस,सोयाबीन अशी हंगामी पिके घेतात परंतु आता ग्लोबल विकास ट्रस्ट ने नदीपात्रात केलेल्या जलसंधारणाच्या कामा मुळे पावसाचे पाणी वाहून न जाता त्याच ठिकाणी मुरल्या जात आहे. या मुळे पाणी पातळीत वाढ होऊन विहिर , बोअर ह्या पाणी स्त्रोतात पाणी वाढ निश्चितच होणार आहे. शेतकऱ्यांच्या आशा आता पल्लवित झाल्या असुन हंगामी पिका बरोबर फळबाग शेती कडे तपोवन चे शेतकरी आता वळणार आहेत. ****

(पान २ वरून).....

# राष्ट्रीय शिक्षण धोरण....


राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र राज्यासाठी आवश्यक असे सर्व बदल करून स्वीकारण्यात येणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत नमूद पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायक आणि रंजक असणे, आवश्यक शिक्षण आणि तार्किक विचारसरणी वाढवण्यासाठी अभ्यासक्रमाचा मजकूर कमी करणे, अनुभवात्मक शिक्षण इत्यादी बाबींचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये असणार आहे.

तसेच मूल्यमापन, अध्यापन पद्धती, वेळापत्रक, निरीक्षण व सनियंत्रण, शिक्षकांचे प्रशिक्षण इ. सर्वांगीण बाबींमध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत आवश्यक त्या सुधारणा निर्गमित केल्या जातील. बालभारतीची पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये वेळोवेळी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संबंधित विभागप्रमुख व विषयतज्ज्ञ यांचा सहभाग असेल. ही पाठ्यपुस्तके निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तींची पूर्तता करणारी व अंमलबजावणीसाठी योग्य आहेत किंवा कसे याची पडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत केली जाईल. त्यानंतर सदर अंतिम पाठ्यपुस्तकांना शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समन्वय समितीची मान्यता घेऊन पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी केली जाईल. अंमलबजावणी वेळापत्रकानुसार, इयत्तानिहाय पाठ्यपुस्तके आवश्यक सर्व माध्यमांत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांची राहणार आहे. तर पाठ्यपुस्तकांना पूरक साहित्य, हस्तपुस्तिका इ. निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमाफत करण्यात येईल. तसेच बालवाटिका १, २, ३ चा पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य, आशय इ. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती कार्यालयामार्फत तयार करून महिला व बालविकास विभागाकडे छपाई व वितरणासाठी सुपुर्द केली जाईल. मूल्यमापन राष्ट्रीय शिक्षण धोरण व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांमधील तरतुदींनुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापनविषयक मार्गदर्शक सूचना स्वतंत्ररीत्या निर्गमित केल्या जाणार आहेत. त्यासाठी समग्र प्रगतिपत्रकाचा (Holistic Progress Card) आधार घेतला जाईल.

राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ यामध्ये सुचवलेल्या दैनिक, साप्ताहिक, वार्षिक वेळापत्रकानुसार, इयत्तानिहाय, विषयनिहाय निश्चित केलेल्या तासिकांची संख्या व कालावधीनुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सत्र निश्चितीचा कालावधी हा प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालककांमार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांच्या सल्ल्याने निश्चित केला जाईल. द्वितीय सत्र अखेरचे संकलित मूल्यमापन/वार्षिक परीक्षा या त्राअखेरच घेण्यात येतील आणि त्यांचे वेळापत्रक आवश्यकतेनुसार प्राथमिक / माध्यमिक शिक्षण संचालकांमार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांच्या सल्ल्याने निर्गमित केले जाईल. एकूणच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे शाश्वत विकासाच्या ध्येयांशी जोडले गेले असून शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणणारे ठरेल, हे निश्चित.

**– ब्रिजकिशोर झंवर**
(विभागीय संपर्क अधिकारी)

हसरा कोपरा..!



भुल दिल्याशिवाय
ऑपरेशन
आणि
दिशाभुल
केल्याशिवाय
राजकारण करताच
येत नाही...!

संपादकीय...

# पिकाला जीवदान..!

यंदाचा पावसाळा सुरू झाल्यानंतर दीड महिन्यापेक्षा अधिक कालावधी जाऊनही पाऊस नसल्याने परळीसह बीड जिल्ह्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. पवित्र श्रावण महिन्यांबरोबर श्रावणसरी बरसू लागल्याने आपल्याकडे खरिपाच्या पिकांना जीवदान मिळाले आहे.

यंदा भर उन्हाळ्यात म्हणजे मे महिन्यात महिनाभर पाऊस बरसत होता हा पाऊस बरसत असताना येणाऱ्या पावसाळ्यात पाऊस पडेल की नाही? अशी शंका जाणकार उपस्थित करत होते. त्यातच हवामान अभ्यासक, हवामान विभागाने यंदा सरासरी पेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त केला होता. त्यामुळे मे महिन्यात पडलेल्या पावसावर पांघरून पडले होते. परंतु जून महिना सुरू झाल्यानंतर सुरूवातीच चार-दोन दिवस पाऊस पडला. मृगनक्षत्रात मात्र पावसाने पाठ फिरवली. जुलैचा तिसरा आठवडा सुरू होऊनही दमदार पाऊस न झाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. पावसाळा सुरू झाल्यानंतर तब्बल दीड महिना पावसाचा खंड पडल्याने पावसाबाबत हवामान खाते व अभ्यासकांनी दिलेला अंदाज खोटा ठरल्याचे लोक बोलत होते. जून, जुलै महिन्यात चार-दोन वेळा कुठे-कुठे झालेल्या बुरबुरीच्या पावसाने त्या भागातील पिके तग धरून होती. परंतु जिथे हाही पाऊस झालेला नव्हता तिथे मात्र पिकांची वाढ खुंटली होती. काही ठिकाणी पिके सुकत चालली होती. पाऊस नसल्याने अनेक म्हणजे तीस टक्क्यंवर शेतकऱ्यांच्या खरिपाच्या पेरण्याही झाल्या नव्हत्या. तीळ, मूगासारखे लवकर येणारे खरिपाचे पीक यंदा पावसामुळे धोक्यात आले होते. ज्यांच्याकडे पाण्याची सोय आहे. अशा शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्यावर कशीबशी आपली पिके जगवली. परंतु हलक्या जमिनीतील व सिंचनाची सोय नसलेल्या शेतकऱ्यांना आपली खरिपाची पिके जगवण्याचे आव्हान निर्माण झाले होते. डोंगरपट्टयातील पिके तर सुकत चालली होती. पुन्हा पेरणी करावी लागते की काय अशी स्थिती या भागातील शेतकऱ्यांची झाली होती.

मे महिन्यातील पावसामुळे आपल्याकडे छोट्या-मोठ्या तलावात काही प्रमाणात जलसाठा झाला होता. शिवाय शेतजमिनीतही ओलावा टिकून होता. विहिरी, बोरलाही पाणी होते. त्यामुळे दीड महिना पाऊस नसूनही यंदा दुष्काळाची दाहकता तीव्र जाणवत नव्हती. असे असले तरी पावसाची आवश्यकता होती. जायकवाडी वगळता मराठवाड्यात बहुतेक धरणात पुरेसा पाणीसाठा नव्हता. यामुळे मोठ्या पावसाची प्रतिक्षा सबंध मराठवाड्याला आहे.

पवित्र श्रावण महिन्याबरोबर श्रावणसरी बरसू लागल्याने खरिपाच्या पिकाला जीवदान मिळाले आहे. यामुळे मोठ्या चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांची खरिपाच्या पिकाबाबतची काळजी दूर झाली आहे. तसेच सर्वसामान्यांचीही भगभग काही प्रमाणात दूर होण्यास मदत झाली आहे. असे असले तरी भूगर्भातील व छोट्या, मोठ्या प्रकल्पातील जलसाठा वाढावा, नद्या, नाले दुथडी भरून वहाण्यासाठी मोठ्या पावसाची आवश्यकता आहे. आता पावसाळ्याची दोन महिने उरले आहेत. पावसाची मोठी नक्षत्रे या कालावधीत आहेत. या काळात धो-धो पाऊस बरसावा असे सर्वांना वाटते आहे. यापुढील काळात असा पाऊस बरसेल असे हवामान खाते व अभ्यासक अंदाज व्यक्त करत आहेत. गेल्या दीड महिन्यात न झालेल्या पावसाचा गॅप यापुढील काळात भरून निघावा ही आशा धरूया.! ***

**✻ सुविचार ✻**

**आधाराची सावली देणारी माणसं आपल्या आयुष्यात असली, की वेदनेच्या उन्हाचा त्रास खरोखरच जाणवत नाही.**


# राष्ट्रीय शिक्षण धोरण : शाश्वत विकासाकडे वाटचाल

**सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभांवर उभारलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण संविधानिक मूल्यांवर आधारित असून सन २०३० पर्यंत साध्य करावयाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांशी जोडले गेले आहे.**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे एकविसाव्या शतकातील पहिले शिक्षण धोरण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात १९६४-१९६६ मध्ये कोठारी आयोग व १९८६ मध्ये आलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण यामुळे राज्य व देशातील शिक्षणामध्ये अनेक सुधारणा घडवून आणल्या आहेत. आता जवळपास ३४ वर्षांनंतर राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ला मंजुरी देण्यात आली आहे. या नवीन धोरणामध्ये पूर्वीच्या १०+२+३ या रचनेमध्ये बदल करून ५+३+३+४ याप्रमाणे रचनात्मक बदल करण्यात आला आहे. यामध्ये पायाभूत स्तरापासून पदवी स्तरापर्यंतच्या शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू आहे. सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभावर उभारलेले हे धोरण संविधानिक मूल्यांवर आधारित आहे. तसेच सन २०३० पर्यंत साध्य करावयाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांशी हे धोरण जोडले गेले आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४; तसेच राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदी योग्य त्या बदलांसह टप्प्याटप्प्याने लागू करण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी समित्या राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अंमलबजावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या कार्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. तसेच या शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० अनुसार ५+३+३+४ आकृतिबंधातील शिक्षणाचे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण (ईसीसीई) यावर आधारित पायाभूत स्तर; तसेच शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण व प्रौढ शिक्षण या घटकांचे अवलोकन करून राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. स्तरांची रचना प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या स्तरांऐवजी पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर, माध्यमिक स्तर हे शब्द वापरण्यात येणार आहेत. पायाभूत स्तरामध्ये तीन ते आठ वयोगटाच्या विद्यार्थ्यांचा आणि बालवाटिका एक, दोन, तीन; तसेच



इयत्ता पहिली व दुसरीचा समावेश असेल. पूर्वतयारी स्तरामध्ये आठ ते ११ या वयोगटाचा आणि इयत्ता तिसरी ते पाचवीचा समावेश असेल. पूर्व माध्यमिक स्तरामध्ये ११ ते १४ या वयोगटाचा आणि इयत्ता सहावी ते आठवीचा समावेश असेल. तर, माध्यमिक स्तरामध्ये वय वर्ष १४ ते १८ आणि इयत्ता नववी ते बारावी या इयत्तांचा समावेश असेल. नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणीचे टप्पे राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी राज्यातील शाळांमध्ये सर्व संबंधित विभागांमार्फत २०२५-२६ पासून टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल. २०२६-२७ या वर्षांमध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल. २०२७-२८ मध्ये इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल, तर २०२८-२९ मध्ये इयत्ता आठवी, दहावी आणि बारावीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल. बालवाटिका १, २, ३ राबविण्याविषयी महिला व बालविकास विभागाच्या सहमतीने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे. अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांच्या आधारे राज्याच्या गरजा लक्षात घेऊन राज्यासाठीचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करण्यात येत आहे. संबंधित स्तराचे अंतिम पाठ्यसाहित्य निर्मितीसाठी बालभारतीस विहित वेळेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नवीन अभ्यासक्रम पहिल्यांदाच लागू होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सेतू अभ्यासक्रम संबंधित सर्व इयत्तांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत तयार करून तो आवश्यक त्या सर्व वर्षांमध्ये वापरण्यात येईल. पाठ्यपुस्तके व पाठ्यसाहित्य

(उर्वरित पान ४ वर)

**अभ्यासक्रम आराखडा......**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ आधारित तयार केलेल्या पुस्तकांचा देशातील २३ राज्यांकडून वापर करण्यात येत आहे. या पाठ्यपुस्तकांची निर्मिती देशभरातील विविध क्षेत्रातील नामवंत, अनुभवी तज्ज्ञ यांच्याकडून करण्यात आली आहे. या पाठ्यपुस्तकांवर आधारित राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांची तयारी केली जाते. देशभरात ही पाठ्यपुस्तके विविध मंडळांच्या शाळांमधून वापरण्यात येतात. राज्यस्तरीय सुकाणू समिती, शिक्षण क्षेत्रातील नामवंत व अनुभवी तज्ज्ञ यांनी साकल्याने विचार करून महाराष्ट्र राज्यातही राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेली इयत्तानिहाय त्या-त्या विषयाची पाठ्यपुस्तके टप्प्याटप्प्याने आवश्यक त्या बदलांसह व संदर्भीकरणासह वापरण्याचे निश्चित केले आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ हे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत तयार करण्यात आले आहेत. तसेच, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ तयार करण्यात आला आहे. शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२५ ची निर्मिती सुरू आह

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

# शिव कावड दिंडीचे परळीत शेकडो भाविकांनी घेतले दर्शन

परळी वैजनाथ (बातमीदार):- श्रावण महिन्यात पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी लातूर ते परळी भव्य दिव्य शिव कावड यात्रा दिंडी निघाली.लातूरच्या मोतीनगर भागातील ललितकुमार बालकिशन शर्मा परिवाराच्या वतीने आयोजित केलेली महादेवाची शिव कावड यात्रा, रविवार, २७ जुलै रोजी सायंकाळी वैद्यनाथ नगरीत दाखल झाली.

पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैजनाथ भगवान चे दर्शन घेण्यासाठी लातूर येथून २५० भाविकांचा सहभाग असलेली महादेवाची कावड यात्रा दिंडी रविवारी सायंकाळी परळीत दाखल झाली. हर हर महादेव, जय भोले, वैजनाथ भगवान की जय असा जय हो उपस्थित भाविकांनी दिल्याने वातावरण भक्तीमय झाले होते. या यात्रेला ढोल ताशांच्या गजरात आणि शेकडो भाविकांच्या उत्साही उपस्थितीत एक विशेष धुमधडाका पाहायला मिळाला. यात्रेच्या स्वागतासाठी परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती, ज्यामुळे यात्रा पारंपरिक धार्मिक उत्सवात रूपांतरित झाली. भाविकांच्या धार्मिक उत्साहात आणि



कावड यात्रेतील आध्यात्मिक उंचीने वातावरण पुर्णपणे पवित्र झाले. उद्या सोमवार दिनांक २८ जुलै रोजी दुपारी चार वाजता ही कावड यात्रा दिंडी लातूरकडे मार्गस्थ होणार आहे.

**शिव कावड यात्रेचे २४ वे वर्ष :-** लातूर शहरातील मोती नगर भागात राहाणारे कै.बालकीशन शर्मा यांनी २३ वर्ष आधी एका छोट्या प्रमाणात मोती नगर भागात राहाणारे मोजके मित्र व कांहीं नातेवाईक घेऊन हि शिवकावड पदयात्रा लातूर ते परळी काढली प्रति वर्षा हि पदयात्रा काढत असताना परिसरातील व नातेवाईक पदयात्रेत जोडत गेली आमच्या सोबत त्यांची पण या शिव कावड पदयात्रेत श्रद्धा वाढत गेली पाहता पाहता या शिव कावड ला अनेक वर्ष लोटत गेली अचानक काही महिने आधी बालकिशनजी (वडील) यांचे आजार पणा मुळे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले.

आमचा मुख्य आधार गेला असल्याने आम्ही चारही भाऊ मनाने थोड खचलो प्रति वर्षाप्रमाणे श्रावण महिना आल्या नंतर आम्ही मनाचा निश्चय करून वडिलांच्या माघारी शिव कावड पदयात्रा काढायचे ठरवून तयारी ला लागलो आज वडीलांच्या निधनानंतर पण शिवकावड पदयात्रा काढत आहोत आज या यात्रेचे तेविसाव्या वर्ष आहे. ललितकुमार बालकिशन शर्मा (व्यापारी, लातूर) *

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वैद्यनाथ विद्यालयात शालेय साहित्याचे वाटप



परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रम अंतर्गत वैद्यनाथ विद्यालय परळी वैजनाथ येथे भाजपा माजी नगरसेवक महादेव इटके व भाजपा परळी यांच्या वतीने शालेय ड्रेस, वह्या व खाऊवाटप करण्यात आले.

यावेळेस भाजपा शहराध्यक्ष सौ उमाताई समशेट्टे , वैद्यनाथ विद्यालय उप मुख्याध्यापक हंगीगिरगे सर वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष श्री.विनोदजी सामत , वैद्यनाथ बँकेचे संचालक संदीप शेठ लहोटी माजी नगराध्यक्ष श्री.वैजनाथ जगतकर जेष्ठ नेते श्री.अब्दुल करीमजी, नगरसेवक पवन मुंडे, वैद्यनाथ बँकेचे संचालक अनिल तांदळे, बाळासाहेब कराळे भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव अँड अरुण पाठक सुशील हरंगुळे अश्विन मोगरकर, विकास हालगे, योगेश पांडकर,नरेशभाई पिंपळे, नितीनजी समशेट्टे ठोंबरे ताई कुरील ताई या वैद्यनाथ विद्यालय शिक्षक राजेश साखरे पापा देशमुख तांदळे सर सचिन मुंडे सर कार्यक्रम चे प्रास्ताविक सुनील देशमुख सर यांनी केले आभार रोडे सर यांनी केले वेळी या वेळी गाव भागातील नागरीक व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालकांचेही सहकार्य हवे-अजय सोळंके

परळी वैजनाथ, (बातमीदार):- विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, त्यांची प्रगती व्हावी यासाठी शाळेने सुरू केलेल्या उपक्रमाला पालकांचे सहकार्य हवे असे प्रतिपादन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य अजय सोळंके यांनी केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील उर्जानगर वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.२६) इयत्ता पहिली ते चौथीच्या पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पालक सुसंवाद मेळाव्यात श्री सोळंके बोलत होते.

शाळेच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास नवीन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, न्यू हायस्कूलच्या पर्यवेक्षिका छाया देशमुख, पर्यवेक्षक एल.आय.वाकडे, पालक प्रतिनिधी अश्विनी होनराव, आरती पट्टणकुडे, सौ.अश्विनी मैंदाड, महादेव काळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. श्री सोळंके म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात



विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. यास पालकांचे सहकार्य हवे असे आवाहन त्यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. शाळेतील चौथीच्या विद्यार्थीनीनी गायलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक भागवतराव मुंडे यांनी केले. यावेळी त्यांनी शाळेतील विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. या संवाद मेळाव्यात सौ.छाया देशमुख, पालक प्रतिनिधी अश्विनी होनराव, आरती पट्टणकुडे, सौ.अश्विनी मैंदाड, श्री काळे आदींसह उपस्थित अनेक पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत विविध सूचना मांडून शाळा राबवत असलेल्या उपक्रमाचे आपल्या मनोगतात कौतुक केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक एल.आय.वाकडे यांनी आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण न देता आनंददायी शिक्षण देण्याचा आम्ही प्रयत्न करतो, विद्यार्थ्यांवर संस्कार घडावेत यासाठी विविध उपक्रम राबवतो अशी माहिती त्यांनी दिली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती देऊन या पालक, शिक्षक, सुसंवाद मेळाव्यात पालकांनी केलेल्या चांगल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे सांगून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी शाळेला सहकार्य करावे असे आवाहन केले. सुत्रसंचालन सौ.आर.आर.जाधव यांनी तर आभार प्रदर्शन विनोद देशमुख यांनी केले. विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांचा यावेळी गौरव करण्यात आला. हा पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी सौ.आर.पी.निटुरे, देवेंद्र चौरे, श्री निरडे, सौ.गंगणे, सौ.आयोध्या राऊत, सौ.देवकर, सौ.शुभांगी मुंडे मॅडम यांच्यासह हरी मुंडे, अभिजीत डिकले आदींनी परिश्रम घेतले. ***

## दरवळणारा सुगंध...

**दुःख हाच गुरू आहे, सुखात माणूस हवेत उडतो... पण दुःख माणसाला विचार करायला शिकवते.**

**आयुष्याच्या प्रत्येक वळणावर कोणत्या परिस्थितीत, कसं जगावं आणि कसं वागावं याचं प्रशिक्षण आपल्याला... आयुष्यभर दुःखाकडून मिळत असतं...!!**

# श्री ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी...

श्रावणमास विशेष

**देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ख्याती असलेल्या परळी वैजनाथ (जि.बीड) येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवाला सुरूवात झाली आहे. पहिल्या श्रावणी सोमवार (दि.२८) निमित्ताने...**

**धार्मिक महत्व-** कांतीपूरी, वैजयंतीक्षेत्र, जयंतीक्षेत्र, पर्यली ही आजच्या परळी वैजनाथची प्राचीन नावे. बालाघाट डोंगररांगांच्या कुशीत हे गाव वसले आहे. जगाच्या उध्दारासाठी भारतभूमीत शिवलिंग अवतरले. वायूच्या संघर्षाने या ज्योतिर्मय स्वरूपाचे बारा भाग होऊन ते इतस्तत: विखुरले. तीच आज प्रसिध्द असलेली ज्योतिर्लिंगे होत. असा उल्लेख ज्योतिर्लिंगाच्या उत्पत्तीविषयी परळी माहात्म्य या प्राचीन ग्रंथात आहे. शिवाचा अवतार असलेला वैद्यनाथ हा चित्ताभूमीत रावणाकरिता प्रकट झाला. तोच परळीचा वैद्यनाथ. अशी पौराणिक कथा या स्थानाबद्दल सांगितली जाते. समुद्रमंथनाच्या वेळी धन्वंतरी वैद्यराज व अमृत ही रत्ने निघाली. अमृत पिण्यासाठी राक्षस



धावले, तेव्हा भगवान विष्णूने अमृतासह धन्वंतरीला शंकराच्या पिंडीत गुप्त केले, त्यामुळे या लिंगाला अमृतेश्वर किंवा वैद्यनाथ हे नाव मिळाले, अशी कथाही सांगितली जाते. या शिवपीठाचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे शंकराचा निवास सहकुटूंबीय आहे. येथे येणाऱ्या शिवभक्तांना बाराही ज्योतिर्लिंगाचेही दर्शन घडते. काशीपेक्षाही अधिक महत्व या स्थानाला असल्याचे येथे मानले जाते. त्यामुळे परळीकरांना काशी यात्रा वर्ज्य आहे. शालिवाहन शके १७०६ चैत्र शुध्द पंचमी शुक्रवार रोजी आहिल्यादेवी होळकर यांनी या मंदिराचा जिर्णोध्दार केल्याची नोंद आहे. ऐसपैस पायऱ्या, प्रशस्त आवार व रमणीय परिसर हे या मंदिराचे वैशिष्ट्ये आहेत. मंदिराभोवती हरिहर, अमृतकुपी, मार्कंडेय ही चिरेबंदी बांधकामे असलेली भव्य तिर्थेआहेत. या मंदिराचे बांधकाम हेमांडपंथी आहे. मंदिर शिखरावर विविध मुर्ती आहेत. त्यात मल्हारराव होळकरांचा अश्वारूढ पुतळाही आहे. मुख्य मंदिराला पाच प्रवेशद्वार आहेत.पुर्वेकडील दरवाजा महाद्वार म्हणून ओळखला जातो. हा भव्य दगडी, कोरीव काम असलेला भक्कम दरवाजा आहे. या महाद्वारावर त्रिकाल चौघड्यांची हजेरी असते. या प्रवेशद्वारातून आत आल्यावर सागवानी लाकडाचा मंडप आहे. या मंडपाखाली नंदीच्या तीन मुर्ती आहेत. शिवभक्तांना येथे आपल्या हाताने श्री ची पूजा करण्याची मुभा आहे. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात श्री गणेश व मराठमोळ्या वेशात पार्वतीचे दर्शन होते. गुढीपाडवा, श्रावणमास, अधिकमास, पौषमास, कार्तिकमास, मकरसंक्रांत, दसरा, दिवाळी या दिवशी विविध धार्मिक उत्सव असतात. महाशिवरात्रीला वार्षिक यात्रा उत्सव असतो.

**निवासाची सोय-** वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टने भाविकांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात विविध भक्त निवास उभारले आहेत. या भक्त निवासस्थानातील खोल्यांना शंभर, दीडशे, दोनशे, आडीचशे रूपये प्रमाणे भाडे आकारले आहे. भक्तनिवासात मोठ्या हॉलचीही सोय आहे. शिवाय शहरात विविध खासगी लॉज आहेत. मंदिराच्या भक्त निवास स्थानातील भक्त निवासाची रूम मिळण्यासाठी मंदिर कार्यालयाचा संपर्क क्रमांक-०२४४६-२२२९०९. **बसने येण्याचा मार्ग** - औरंगाबाद-बीड-परळी अंतर २४०, नांदेड-गंगाखेड-परळी अंत ११०, पुणे-नगर-परळी ३४०, पुणे-इंदापूर-बार्शी-परळी ३६०, मुंबई-चाकन-नगर-परळी ५२०, लातूर-परळी ६५ किलोमीटर असे अंतर आहे. **परळीत येण्यासाठी रेल्वे सुविधा-** औरंगाबाद-परभणी-परळी, नांदेड-परभणी-परळी, हैदराबाद-लातूर रोड रोड-परळी, मिरज-पंढरपूर-परळी, बेंगलोर-परळी, हैदराबाद, सिकंदराबाद-परळी, कोल्हापूर-परळी-नागपूर, पुणे-लातूर-परळी, मुंबई-लातूर, सिकंदराबाद-परळी-काकीनाडा, परळी-परभणी-पुर्णा-आकोला अशा रेल्वे गाड्यांची सोय येथे आहे.

**- लक्ष्मण वाकडे** (पत्रकार), परळी वैजनाथ.